# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे — ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. २९८/२०२५

### "त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक २०२५–२६" विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकरिता (पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील विज्ञान विद्याशाखा आणि दुसऱ्या वर्षी विज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर विद्याशाखेत पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थीनीस दरवर्षी आलटून–पालटून **''त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक''** प्रदान करण्यात येते. सन २०२५–२६ मध्ये **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकरिता** पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनीस विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

**नियम व अटी :**

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनीस हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येईल.

२) विद्यार्थिनी इयत्ता दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत उत्तम गुणाने उत्तीर्ण झालेली असावी.

३) विद्यार्थिनी भारतीय संस्कृती, आचार विचार, भारतीय परंपरा मानणारी व त्यांचे स्वत:च्या दैनंदिन जीवनात आचरण करणारी असावी.

४) विद्यार्थिनीने जास्तीत जास्त प्रकारच्या खेळामध्ये भाग घेतलेला असावा. अशा विद्यार्थिनीस प्राधान्य देण्यात येईल.

५) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांगुणांपैकी जास्तीत जास्त प्रकारामध्ये सहाभाग असावा. विद्यार्थिनी होतकरू व हरहुन्नरी व्यक्तिमत्वाची असावी.

६) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहीम तसेच आरोग्यविषयक जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

७) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील पात्र विद्यार्थीनी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनीचा सुवर्णपदकासाठी विचार करण्यात येईल.

८) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थिनीस अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

९) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारी विद्यार्थिनी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यापीठ विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, **''त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदकसाठी''** खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थीनीची माहिती, आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **दि. २९ नोव्हेंबर, २०२५** पूर्वी शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे — ०७
संदर्भ :शै. प्रवेश/ २११८
दिनांक : १३/११/२०२५

13/11/2025

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

C\Vishnu\Award-Gold Medal\Shelar Mami \Circular of Shelar Mami